विषय : सन 2022-2023 या आर्थिक वर्षातील अंतर्गत लेखापरीक्षण अहवालाबाबत...

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 106 मधील तरतुदी नुसार प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपुर्ण लेख्यांवरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मुख्य लेखापरिक्षण विभागाकडून विविध विभागातील विविध आर्थिक वर्षातील दस्ताऐवज/अभिलेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण करण्यात येऊन संबंधितांना अर्ध समास ज्ञापन निर्गमीत करण्यात येतात. परंतु संबंधित विभागांनी अर्ध समास ज्ञापनांचे अनुपालन सादर न केल्यामुळे/अनुपालना सोबत कोणतेही दस्ताऐवज सादर न केल्यामुळे सदर अर्ध समास ज्ञापन आक्षेपात रूपांतरीत करून त्याची नोंदअंतर्गत लेखापरीक्षण अहवालत घेण्यात येते.

सन 2022-2023 या आर्थिक वर्षातील अंतर्गत लेखापरीक्षण अहवालात अर्धसमास ज्ञापनाचे अनुपालन सादर न केल्यामुळे/अनुपालन सोबत कोणतेही दस्तऐवज सादर न केल्यामुळे अर्ध समास ज्ञापन आक्षेपात रूपांतरीत करुन त्याची नोंदअंतर्गत लेखापरीक्षण अहवालात घेण्यात आली आहे.

सदर अंतर्गत लेखापरीक्षण अहवालात विविध विभागांचे सन 2022-2023 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण दस्तऐवजाबाबत (1) लेखा विभाग सिक्युरीटी डिपोजिट चे सर्वसाधारण पावती, चलन व भरणा तपासणी बाबत. (2) वाहन विभाग चे विविध वाहन नस्ती (3) प्रभाग समिती क्र.01 चे संगणकीय पावती पुस्तक, हॉलभाडे, धनादेश रजिष्ट्रर, जन्म मृत्यु (4) प्रभाग समिती क्र.02 चे संगणकीय पावती पुस्तक, जन्म मृत्यु (5) प्रभाग समिती क्र.03 विवाह नोंदणी, हॉल भाडे (6) प्रभाग समिती क्र.04 (7)प्रभाग समिती क्र.05 (8)परवाना विभाग चे जाहिरात विभाग तील शो टॅक्स,बॅनर परवांगी, परवाना फि (9)आस्थापना विभाग (10)आभिलेख विभाग चे सर्व्हिस बुक विक्री चे सर्व साधारण पावती चलन भरणा व इतर आक्षेप समाविष्ट करणयात आलेले असुन विभागनिहाय एकुण आक्षेप, वगळण्यात आलेले अर्धसमास, शिल्लक अर्धसमास तपशील खालील प्रमाणे.

सन 2022-2023

| अ.क्र | विभाग | एकुण आक्षेप संख्या | वगळण्यात आलेले अर्धसमास संख्या | शिल्लक आक्षेप संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | लेखा विभाग | 19 | 11 | 08 |
| 2 | वाहन विभाग | 06 | 00 | 06 |
| 3 | प्रभाग समिती क्र.01 | 03 | 00 | 03 |
| 4 | प्रभाग समिती क्र.02 | 07 | 00 | 07 |
| 5 | प्रभाग समिती क्र.03 | 05 | 01 | 04 |
| 6 | प्रभाग समिती क्र.04 | 01 | 00 | 01 |
| 7 | प्रभाग समिती क्र.05 | 02 | 00 | 02 |
| 8 | परवाना विभाग | 09 | 00 | 09 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | आस्थापना विभाग | 27 | 00 | 27 |
| 10 | अभिलेख विभाग | 02 | 02 | 00 |
| | एकुण | 81 | 14 | 67 |

मा. केंद्र व राज्य शासनाकडून मनपास मिळणारे अनुदान हे मनपास गुणसूची मधील गुणावरून निश्चित करण्यात येत असून सदर गुणसूचीमध्येअंतर्गत लेखापरीक्षण अहवालाचा देखील समावेश आहे. तसेच सन 2022-2023 या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल प्रगतीबाबत केंद्र व राज्य शासनाकडून वारंवार विचारणा होत असते.

तरी अंतर्गत लेखापरीक्षण अहवालास मा. स्थायी समितीची मान्यता मिळाल्यास केंद्र व राज्य शासनाकडून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस मिळणाऱ्या अनुदानाच्या गुणसुचीमधील गुणामध्ये वाढ होऊन महानगरपालिकेच्या अनुदानामध्ये भर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या स्थायी समितीचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांच्याकडे निहीत आहेत. तरी विषयांकित प्रस्तावास मान्यता प्रदान होऊन प्रशासकीय ठराव मंजुर होणेस विनंती.

प्रशासकीय ठराव क्र. ४९२ दिनांक 23/८/2024

सन 2022-2023 या आर्थिक वर्षातील अंतर्गत लेखापरीक्षणाबाबत केंद्र व राज्य शासनाकडून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस मिळणाऱ्या अनुदानाच्या गुणसुचीमधील गुणामध्ये वाढ होऊन महानगरपालिकेच्या अनुदानामध्ये भर पडण्याच्या द्रष्टीनेमुख्य लेखा परिक्षणाचा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल सन 2022-2023 यास महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71(भाग-2) नवि-14 दि.6 जुन 2022 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(श्री.अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.